:: प्रेस नोट ::

कस्तुरबा मार्ग पोलिस ठाणे हद्दीतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथे येणाऱ्या पर्यटकांना विहीत दरापेक्षा अधिक दराची बनावट तिकीटांची विक्री करून शासनाची फसवणूक करणाऱ्या इसमास अटक केलेबाबत.

दिनांक ०६/१०/२०२६ रोजी फिर्यादी श्री. शिवराज बालाजी उगले, ३१ वर्षे, वनपाल, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली पु. मुंबई हे त्यांचे दैनंदिन कर्तव्य करीत असताना राष्ट्रीय उद्यानात आलेल्या एका पर्यटकाने राष्ट्रीय उद्यानात प्रवेशा करिता एका इसमाने फाटलेल्या तिकीटाची विक्री केल्याची तक्रार केली. फाटलेले तिकीट विक्री करण्याची पध्दत योग्य नसल्याने श्री. उगले यांनी तिकीट काउंटर जावून विचारणा केली असता, तिकीट काउंटर वरून या तिकीटांची विक्री झाली नसल्याची माहिती प्राप्त झाली. तिकीट विक्री करणारा इसम नामे आकाश रविंद्र सरदार याचेकडे मिळालेली एकूण ०९ तिकीटे ही तिकीटाचा कागद त्यावरील प्रिंट आणि फॉन्ट हे तिकीट काउंटर वरील तिकीटांसारखे पुर्णत: मिळते जुळते नसल्याचे वनपाल श्री. शिवराज उगले यांचे लक्षात आले. त्याप्रमाणे तिकीट विक्री करणारा इसम नामे आकाश सरदार यास कस्तुरबा मार्ग पोलीस ठाण्याच्या ताब्यात देवून श्री. शिवराज बालाजी उगले, ३१ वर्षे यांनी समक्ष दिलेल्या फिर्यादीनुसार कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ६८४/२०२६ कलम ३१८ (४), ३३६ (३), ३४० (२) अन्वये गुन्हा करण्यात आला.

बनावट तिकीट विक्री करणारा इसम नामे आकाश रविंद्र सरदार वय ३१ वर्ष याचेकडे केलेल्या प्राथमिक तपासात सुरुवातीस त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. परंतू त्याचेकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता, सदर बनावट तिकीटे ही इसम नामे गणेश ईश्वर ठाकूर याने बनवून आकाश सरदार यास विक्री करण्याकरिता दिली असल्याची माहिती दिली. त्याप्रमाणे आकाश रविंद्र सरदार, ३१ वर्षे यास प्रस्तूत गुन्हयात अटक करण्यात आली. इसम नामे गणेश ठाकूर याचेकडे बनावट तिकीटे बनवण्याची मशीन व सॉफ्टवेअर असलेबाबत खात्रीशीर माहिती मिळाली. त्याप्रमाणे गणेश ठाकूर यास नमूद गुन्हयात पाहिजे आरोपी म्हणून दर्शविण्यात आले. पाहिजे आरोपीस लवकरच अटक करण्यात येत आहे.

अटक आरोपीकडे कौशल्यपुर्ण तपास करून त्याचा साथीदार मुख्य आरोपी गणेश ईश्वर ठाकूर याचा सहभाग प्रस्तूत प्रकरणी निष्पन्न करण्यात आला असून, नमूद आरोपितांनी अद्यापपावेतो बनावट तिकीट विक्री करून शासनाची नेमकी आणखीन किती फसवणूक केली आहे ? याबाबत अधिक तपास करण्यात येत आहे.

सदरची कारवाई मा. श्री. शशीकुमार मीना सो, अप्पर पोलीस आयुक्त मा. श्री. गजानन राजमाने सो, पोलीस उप-आयुक्त, उत्तर परिमंडळ-३, मा. श्री. जयराज रणवरे सो, सहाय्यक पोलीस आयुक्त, दहिसर विभाग यांच्या मार्गदशनाखाली वपोनि श्री. बाळासाहेब बनकर, पोनि श्री. योगेश पवार, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि संभाजी थोरात तपासी अधिकारी पो.उ.नि. साईनाथ बारगजे, पोह मुजावर, म्हात्रे, पोशि पुरी, फर्डे, वडर, सांगळे, शिंगटे यांनी केलेली आहे.